# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः22.10.2025** **वारःबुधवार**

---

1. देशात किरकोळ विक्री क्षेत्रात सणासुदीच्या काळात सर्वाधिक विक्रीची नोंद
2. दीपावलीच्या प्रकाशपर्वामध्ये राज्यात चैतन्याचं वातावरण; पाडव्यानिमित्त आज बाजारपेठांमध्ये उत्साह
3. अतिवृष्टी, पुरामुळे बाधित राज्यातल्या शेतकऱ्यांना आता 3 हेक्टरपर्यंतच्या बाधित क्षेत्रासाठी मदत मिळणार आणि
4. ऐन दिवाळीत राज्याच्या अनेक भागात पावसाची हजेरी, आजही पावसाची शक्यता

**किरकोळ विक्री**

देशातील किरकोळ विक्री क्षेत्रानं यावर्षी नवरात्र ते दिवाळी दरम्यान सणासुदीच्या हंगामातील सर्वाधिक विक्री नोंदवली. यामध्ये अभूतपूर्व 5 लाख 40 हजार कोटी रुपयांच्या वस्तू आणि 65 हजार कोटी रुपयांच्या सेवांची उलाढाल झाली. अखिल भारतीय व्यापारी महासंघानं केलेल्या देशव्यापी सर्वेक्षणात, याच कालावधीत एकंदर उलाढाल गेल्या वर्षीच्या तुलनेत 25 टक्क्यांनी वाढल्याचं दिसून आलं आहे. प्रामुख्यानं GST दरांमध्ये घट झाल्यामुळं ही वाढ झाली आहे. मिठाई, गृहसजावट, पादत्राणं, तयार कपडे, ग्राहकोपयोगी आणि दैनंदिन वापराच्या वस्तूंच्या किंमती सर्वसामान्य लोकांच्या आवाक्यात आल्या आहेत आणि खरेदीचा वेग वाढला आहे.

**पंतप्रधान**

जागतिक पातळीवर अनेक आव्हानं असताना, भारत स्थैर्य आणि संवेदनशीलतेचं प्रतिक म्हणून उदयाला येत असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. दिवाळीनिमित्त त्यांनी काल देशातील नागरिकांना उद्देशून पत्र लिहिलं. नजीकच्या भविष्यात भारत जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या मार्गावर आहे, विकसित आणि आत्मनिर्भर भारताच्या या प्रवासात, राष्ट्राप्रती असलेली कर्तव्य पार पाडणे ही प्रत्येक नागरिकाची प्राथमिक जबाबदारी आहे, असं पंतप्रधानांनी म्हटलं आहे.

**दीपावली**

दीपावलीच्या प्रकाश पर्वातील सर्वात महत्त्वाचा लक्ष्मीपूजनाचा सण काल राज्यात सर्वत्र उत्साहात पार पडला. घरोघरी तसंच व्यावसायिक आस्थापनांमध्ये पारंपरिक पद्धतीनं लक्ष्मीपूजन झालं. लक्षवेधक रांगोळ्या, आकर्षक रोषणाई आणि आसमंत उजळून टाकणारी आतषबाजी, असं चैतन्यमयी वातावरण काल सर्वत्र होतं. शिर्डीच्या साईबाबा संस्थानात साईबाबांच्या समाधी मंदिरात लक्ष्मी-कुबेर पूजन करण्यात आलं. लक्ष्मीपूजनाच्या निमित्तानं शेअर बाजारात काल दुपारी मुहूर्ताचे सौदे पार पडले. त्यावेळी मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक 63 अंकांची वाढ नोंदवत 84 हजार 426 अंकांवर बंद झाला. तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी 25 अंकांची वाढ नोंदवत 25 हजार 869 अंकांवर बंद झाला.

दिवाळीच्या निमित्ताने पुण्यासह विविध शहरांमध्ये पहाट मैफिलींचं आयोजन करण्यात येत आहे. तसंच सामाजिक उपक्रमही राबवले जात आहेत. माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी छत्रपती संभाजीनगरमधल्या वैजापूर तालुक्यातल्या अतिवृष्टीग्रस्त कुटुंबांबरोबर दिवाळी साजरी केली. यावेळी अतिवृष्टीग्रस्त कुटुंबीयांना किराणा सामान, आवश्यक वस्तू भेट म्हणून दिल्या. खासदार डॉ. कल्याण काळे यांनी भगवान बाबा बालिकाश्रमात अनाथ मुलांसमवेत दिवाळी साजरी केली.

बुलडाण्यामध्ये श्रीरामजी कुटे गुरुजी सामाजिक संस्थेच्या वतीनं जळगाव जामोद, संग्रामपूर, शेगावसह विविध भागातल्या अनाथ मुलांबरोबर दिवाळी साजरी करण्यात आली. अहिल्यानगरमधील तुकाराम कातोरे मित्र मंडळानं रेल्वे स्थानकावरच्या बेवारस नागरिकांची दिवाळी गोड करण्यासाठी विविध उपक्रम राबवले.

महाराष्ट्र नवनिर्माण सेना पुणे शहर आणि प्रल्हाद गवळी मित्र परिवाराच्या वतीने निराधार आणि ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते दीपावलीचा दिवा लावून दिवाळी साजरी करण्यात आली.

स्वराज्याचे शिलेदार प्रतिष्ठानच्या वतीने पानशेत इथल्या वीर बाजी पासलकर स्मारकाची स्वच्छता करून काल दीपोत्सव साजरा करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांना पहिला दिवा अर्पण करण्यात आला.

आज कार्तिक शुद्ध प्रतिप्रदा म्हणजेच बलिप्रतिपदा, अर्थात दिवाळी पाडव्याचा सण साजरा होत आहे. साडे तीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या पाडव्याला गृहखरेदी, नवीन वस्तू तसंच सोने चांदी खरेदी केली जाते. या निमित्तानं बाजारपेठेत उत्साहाचं वातावरण आहे.

एकीकडे सर्वत्र दिवाळीचा उत्साह असताना दुसरीकडे वाशिम जिल्ह्यात मात्र झेंडुच्या फुलांचे दर घसरल्याने झेंडु उत्पादक शेतकरी चिंतेत आहे.

**सामाजिक दिवाळी-सिंधुदुर्ग**

आनंदाचा आणि मांगल्याचा सण असं दिवाळीच वर्णन केलं जातं. घराघरात उत्साह आणि आनंद ओसंडून वाहत असताना काही घर मात्र  घरापासून दूर असलेल्या आपल्या मुलाबाळांच्या प्रतीक्षेत असतात. अशा एकाकी वृद्ध नागरिकांसाठी सिंधुदुर्ग पोलिसांनी विश्वासाचा, आपुलकीचा आणि मायेचा हात पुढे केलाय. ऐकुया याबाबतचा वृत्तांत...

**सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक डॉक्टर मोहन दहिकर यांच्या संकल्पनेतून एकाकी जीवन जगत असलेल्या जेष्ठ नागरिकांसाठी 'संवादातून आधार' हे व्हाट्सअप चॅनेल सुरू केलंय. दिवाळीनिमित्त जिल्ह्यात 22 ठिकाणी या ज्येष्ठ नागरिकांचे मेळावे घेऊन त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. त्यामध्ये 801 ज्येष्ठ नागरिक सहभागी झाले होते. जे ज्येष्ठ नागरिक या मेळाव्यांना उपस्थित राहू शकले नाहीत अशा सुमारे 150 जेष्ठ नागरिकांच्या घरी जाऊन पोलीस यंत्रणे कडून शुभेच्छा देण्यात आल्या. कम्युनिटी पोलीस अंतर्गत पोलीस दलाकडून ज्येष्ठ नागरिकांसाठी मदत कक्ष कार्यरत करण्यात आलाय. त्यासाठी पोलीस दलाकडून हेल्पलाइन क्रमांक 7036 606060 ही सेवा कार्यान्वित केलीय. 'संवादातून आधार' या व्हाट्सअप चॅनेलच्या क्रमांकावर एकाकी राहणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या दूर करण्यासाठी चॅनेलवर व्हाट्सअप व्हिडिओ किंवा ऑडिओ कॉल द्वारे संवाद साधला जातो. या उपक्रमांतर्गत अधीक्षक दहीकर, अप्पर पोलीस अधीक्षक, नयोमी साटम यांच्यासह जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यातील अधिकारी व पोलीस अंमलदार सहभागी झालेत. जेष्ठ नागरिकांसाठी आयोजित मेळाव्यात ज्येष्ठ नागरिक कायदा, सायबर क्राईम, संवादातून आधार, समुद्र संदेश याबाबत माहिती त्यांना देण्यात आली. तसंच मालवण आणि वेंगुर्ले पोलीस ठाण्यात जेष्ठ नागरिकांसाठी आरोग्य तपासणी शिबिर मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले. सिंधुदुर्ग पोलिसांच्या या संवेदनशील कृतीमुळे ज्येष्ठ नागरिकांची दिवाळी मात्र अधिक आनंददायी झाली आहे.**

**शासन आदेश**

यंदाच्या पावसाळ्यात अतिवृष्टी आणि पुरामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आता 3 हेक्टरपर्यंतच्या बाधित क्षेत्रासाठी मदत मिळणार आहे. याकरता विशेष बाब म्हणून 648 कोटी 15 लाख 41 हजार रुपयांच्या निधी वितरणाला मान्यता देण्यात आली आहे. मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी ही माहिती दिली. या बाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. यंदाच्या खरीप हंगामात शेतकऱ्यांना सुमारे 8 हजार 139 कोटी रुपयांचं अर्थसहाय्य वितरित करण्याबाबतचे शासन निर्णय जारी झाले आहेत.

**पोलीस स्मृती दिन**

पोलीस स्मृतिदिनानिमित्त काल देशात सर्वत्र हुतात्मा पोलिसांना अभिवादन करण्यात आलं. उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हुतात्मा पोलिसांच्या बलिदानाचं स्मरण करून त्यांना श्रद्धांजली वाहिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईतल्या नायगाव इथल्या पोलीस मुख्यालयात पोलीस स्मृतीस्तंभावर पुष्पचक्र अर्पण करून त्यांना अभिवादन केलं. हे राष्ट्र पोलिसांचं बलिदान कधीही विसरणार नाही, असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. राज्यातल्या सर्व जिल्हा मुख्यालयांमध्ये काल हुतात्मा पोलिसांना अभिवादन करण्यात आलं. पुण्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पोलीस स्मृतीस्तंभावर पुष्पचक्र अर्पण करुन आदरांजली वाहिली. रत्नागिरी, सांगली, नंदुरबार यासह अन्य जिल्ह्यांमध्येही काल पोलीस स्मृतीदिना निमित्त अभिवादन करण्यात आलं.

**बीड-घरकुल**

'दिवाळी नवीन घरकुलात' या उपक्रमांतर्गत बीड जिल्ह्याने राज्यात विक्रमी कामगिरी केली आहे. प्रधानमंत्री आवास योजना तसंच राज्य पुरस्कृत घरकुल योजनेअंतर्गत बीड जिल्ह्यातील 50 हजारांहून अधिक घरकुलं विक्रमी वेळेत पूर्ण करण्यात आली आहेत. या निमित्तानं बीडकरांचं हक्काच्या घरात राहण्याचं स्वप्न साकार झालं आहे. या कामासाठी शासनातर्फे 990 कोटींचा निधी वितरित करण्यात आला. या कामगिरीबद्दल बीड जिल्ह्याचे पालकमंत्री आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, यंत्रणेतील सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांसह लाभार्थ्यांचं अभिनंदन केलं आहे.

**आंबे पेटी-नवी मुंबई**

दिवाळीच्या मुहूर्तावर देवगडच्या हापूस आंब्याची पहिली पेटी काल नवी मुंबईतल्या एपीएमसीमध्ये दाखल झाली. सिंधुदुर्ग जिल्ह्यात देवगड इथल्या पडवणे गावचे आंबा बागायतदार प्रकाश शिरसेकर यांच्या बागेतले हे आंबे आहेत.

**<u>नवी मुंबई-आग</u>**

नवी मुंबईत काल आगीच्या दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये 6 जणांचा मृत्यू झाला. वाशी विभागात एका निवासी संकुलात पहाटे आग लागून 4 जणांचा मृत्यू झाला, तर 10 पेक्षा जास्त जण जखमी झाले. दुसऱ्या एका घटनेत कामोठे इथं सिलेंडरचा स्फोट होऊन लागलेल्या आगीत दोघींचा मृत्यू झाला.

**<u>निधन-जळगाव</u>**

जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव तालुक्याचे माजी आमदार आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते राजीव देशमुख यांचं काल हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने निधन झालं. ते 55 वर्षांचे होते.

**<u>पाऊस</u>**

ऐन दिवाळीत राज्याच्या अनेक भागात काल जोरदार पाऊस झाला. मुंबई, ठाणे, पुणे, रत्नागिरी, रायगड, नाशिक, अहिल्यानगर, जालना आदी जिल्ह्यांमध्ये पावसानं हजेरी लावली. नाशिक शहर तसंच जिल्ह्यात सायंकाळी पावसाच्या सरी बरसल्या, येवला, सटाणा, निफाड, कळवण तालुक्यांत अधिक पाऊस झाला. येवल्यामध्ये कापणी झालेल्या मक्याचं नुकसान झालं. रायगडमध्ये जोरदार वादळी वारे आणि मुसळधार पावसानं जनजीवन विस्कळीत झालं. भातकापणीचा हंगाम सुरू असल्यानं भात पिकाचं मोठं नुकसान झालं आहे.

**<u>हवामान</u>**

दक्षिण कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी जोराचे वारे आणि वीजांसह जोरदार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.